निखिल सोनोने, डॉ. उल्हास गायकवाड


मागील भागामध्ये आपण पावसाळ्यामध्ये जनावरांच्या शरीरावर किंवा शरीरात परजीवी वाढण्याची कारणे जाणून घेतली. परजीवी वाढल्यामुळे जनावरांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांची माहिती घेतली. या लेखामध्ये आपण या परजीवींच्या एकात्मिक व्यवस्थापनाची माहिती घेऊ.

# पावसाळ्यातील परजीवी कीटकांचे एकात्मिक व्यवस्थापन

भाग २

पावसाळ्यात वाढलेली आर्द्रता, ओलसर वातावरण आणि साचलेले पाणी यामुळे गोचीड, उवा, पिसू, माश्या, डास तसेच अंतर्गत जंत यांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढतो. या परजीवींमुळे जनावरांमध्ये रक्तक्षय, वजन घटणे, दूध उत्पादनात घट, त्वचारोग आणि प्रजनन समस्यांसारखे गंभीर परिणाम दिसून येतात. त्यामुळे परजीवी नियंत्रणासाठी केवळ औषधोपचार न करता गोठ्याची स्वच्छता, नियमित जंतनिर्मूलन, बाह्य परजीवी नियंत्रण, योग्य चराई व्यवस्थापन, जैविक नियंत्रण, संतुलित पोषण आणि जैवसुरक्षा उपाय यांचा एकत्रित अवलंब करणे आवश्यक आहे. यास एकात्मिक परजीवी व्यवस्थापन असे म्हणतात.

नियमित निरीक्षण, नोंदी ठेवणे, वेळेवर लसीकरण आणि पशुवैद्यकीय सल्ल्याचे पालन केल्यास परजीवींचा प्रभावी प्रतिबंध करता येतो. या उपायांमुळे जनावरांचे आरोग्य सुधारते, दूध व मांस उत्पादन वाढते, औषधांवरील खर्च कमी होतो आणि पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळून पशुपालन व्यवसाय अधिक फायदेशीर बनतो.




एकात्मिक परजीवी व्यवस्थापन

## एकात्मिक परजीवी व्यवस्थापन

### गोठा व्यवस्थापन

- गोठ्याची स्वच्छता ही परजीवी नियंत्रणाची पहिली आणि सर्वांत महत्त्वाची पायरी आहे.
- गोठ्यातील शेण, मूत्र व इतर कचरा दररोज काढून परिसर स्वच्छ ठेवावा.
- आठवड्यातून किमान एकदा निर्जंतुकीकरण करावे.
- जनावरांच्या खाद्य व पिण्याच्या पाण्याची भांडी नियमित स्वच्छ धुवावीत.
- गोठ्यात किंवा परिसरात पाणी साचू देऊ नये आणि निचऱ्याची व्यवस्था चांगली ठेवावी.
- जनावरांसाठी नेहमी स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध असावे.
- ओला व घाणेरडा बिछाना त्वरित बदलून कोरडा भुसा, टरफले किंवा गवत वापरावे.
- शेणाचे योग्य व्यवस्थापन करून त्याचा कंपोस्ट किंवा बायोगॅस निर्मितीसाठी उपयोग करावा.
- स्वच्छ, कोरडा व हवेशीर गोठ्यामध्ये परजीवींची अंडी, अळ्या तसेच माश्या-डासांची वाढ कमी होते.

### नियमित जंतनिर्मूलन

अंतर्गत परजीवींच्या नियंत्रणासाठी नियमित व नियोजनबद्ध जंतनिर्मूलन करणे अत्यंत आवश्यक आहे. पावसाळ्यापूर्वी (मे-जून), पावसाळ्याच्या मध्यात (ऑगस्ट) आणि पावसाळ्यानंतर (ऑक्टोबर-नोव्हेंबर) जंतनाशक औषध द्यावे. लहान वयातील जनावरांना प्रौढ जनावरांच्या तुलनेत अधिक वेळा जंत निर्मूलनाची आवश्यकता असते. जंतनाशक औषधांची अदलाबदल (Rotation) करावी आणि शक्य असल्यास मल तपासणी (Fecal Egg Count) करूनच योग्य औषधाची निवड करावी. नियमित जंत निर्मूलनामुळे अंतर्गत जंतांचे प्रभावी नियंत्रण होते, जनावरांची वाढ व वजन सुधारते, दूध व मांस उत्पादन वाढते तसेच रोगप्रतिकारक शक्ती वाढून मृत्यूचे प्रमाण कमी होते.

### बाह्य परजीवी नियंत्रण

गोचीड, उवा, पिसू, माश्या व डास यांसारख्या बाह्य परजीवींच्या नियंत्रणासाठी योग्य औषधांचा आणि व्यवस्थापनाचा समन्वयित वापर करावा. सायपरमेथ्रीन, डेल्टामेथ्रीन, अमिट्राझ आणि आयव्हरमेक्टिन यांसारखी औषधे पशुवैद्यकांच्या सल्ल्यानुसार वापरावीत. ही औषधे स्प्रे, डिपिंग, पोर-ऑन किंवा गरजेनुसार इंजेक्शनद्वारे दिली जाऊ शकतात. गोठ्याच्या भिंती, मजला आणि परिसरात नियमित कीटकनाशक फवारणी करावी. गोचीड वाढणारी गवत व झुडपे साफ ठेवावीत तसेच गोठ्याभोवती माश्या व डास नियंत्रणासाठी फ्लाय ट्रॅप्सचा वापर करावा. नियमित बाह्य परजीवी नियंत्रणामुळे जनावरांचे आरोग्य चांगले राहते, रक्तक्षय व त्वचारोग कमी होतात आणि उत्पादनक्षमतेत वाढ होते.

### चराई व्यवस्थापन

परजीवींचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी योग्य चराई व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. एकाच कुरणात सतत चराई न करता रोटेशनल ग्रेझिंग (आलटून-पालटून चराई) पद्धतीचा अवलंब करावा. यामुळे जंतांच्या अळ्यांचा जीवनक्रम खंडित होऊन कुरणातील संसर्ग कमी होतो. चाऱ्याचे उत्पादन व गुणवत्ता सुधारते आणि जनावरांना स्वच्छ व पौष्टिक चारा उपलब्ध होतो. अतिचराई टाळावी व पावसाळ्यात अतिओलसर कुरणांमध्ये चराई कमी करावी. लहान वयाची जनावरे शक्यतो स्वच्छ व कमी संसर्ग असलेल्या कुरणात चरावीत. योग्य चराई व्यवस्थापनामुळे परजीवींचा प्रसार कमी होऊन जनावरांचे आरोग्य आणि उत्पादनक्षमता सुधारते.

### जैविक नियंत्रण

जैविक परजीवी नियंत्रणामध्ये Duddingtonia flagrans या उपयुक्त बुरशीचा प्रभावी वापर केला जातो. ही बुरशी जनावरांच्या विष्ठेमध्ये वाढते. ती जंतांच्या अळ्यांना पकडण्यासाठी जाळ्यासारखी विशेष रचना तयार करते व त्यांचा नाश करते. त्यामुळे कुरणामध्ये संसर्गजन्य अळ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी होते आणि परजीवींचा प्रसार रोखण्यास मदत होते. ही पद्धत पर्यावरणपूरक असून रासायनिक जंतनाशकांचा वापर कमी करण्यास साह्य करते. औषधांविरुद्ध परजीवींची प्रतिकारशक्ती (Anthelmintic Resistance) निर्माण होण्याचा धोका कमी होतो. दीर्घकालीन व शाश्वत परजीवी नियंत्रणासाठी Duddingtonia flagrans ही प्रभावी जैविक नियंत्रण पद्धती मानली जाते.

### पोषण व्यवस्थापन

संतुलित व पौष्टिक आहारामुळे जनावरांची रोगप्रतिकारक शक्ती वाढून परजीवींचा प्रतिकार करण्याची क्षमता सुधारते. जनावरांना हिरवा चारा, योग्य प्रमाणात सुक्या चाऱ्याचा समावेश, संमिश्र खाद्य आणि नेहमी स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे. आहारामध्ये कॅल्शिअम, फॉस्फरस, झिंक, कॉपर, सेलेनियम तसेच जीवनसत्त्वे A, D आणि E यांचा समावेश असलेले खनिज मिश्रण नियमित द्यावे. योग्य पोषणामुळे रक्त निर्मिती सुधारते, वाढ व प्रजनन कार्यक्षमता वाढते आणि परजीवींच्या दुष्परिणामांचा प्रभाव कमी होतो. त्यामुळे जनावरांचे आरोग्य, उत्पादनक्षमता आणि एकूण कार्यक्षमता चांगली राहते.

### जैवसुरक्षा उपाय

परजीवी व इतर संसर्गजन्य रोगांचा प्रसार रोखण्यासाठी जैवसुरक्षा उपायांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. नवीन जनावरे १५–३० दिवस विलगीकरण मध्ये ठेवून त्यांची आरोग्य तपासणी व जंत निर्मूलन करावे. जनावरांचे शरीराचे तापमान, भूक, वजन, दूध उत्पादन, त्वचेची स्थिती, मल तपासणी आणि श्लेष्मल त्वचेचा रंग यांचे नियमित निरीक्षण करावे. आजारी जनावरे त्वरित इतर जनावरांपासून वेगळी ठेवावीत. गोठ्यात येणारी बाहेरील वाहने, उपकरणे व साहित्य यांचे निर्जंतुकीकरण करावे. पशुपालकांनी स्वच्छ पादत्राणे व कपडे वापरावेत. याशिवाय उंदीर, माश्या आणि डास यांचे प्रभावी नियंत्रण ठेवल्यास परजीवी व रोगांचा प्रसार कमी होऊन जनावरांचे आरोग्य सुरक्षित राहते.

### नियमित निरीक्षण व नोंदी

परजीवी नियंत्रण कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी नियमित निरीक्षण व अचूक नोंदी ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जंत निर्मूलनाची तारीख, वापरलेली जंतनाशक औषधे आणि त्यांचा डोस यांची नोंद ठेवावी. तसेच जनावरांचे दूध उत्पादन, वजन, आरोग्य स्थिती आणि आजारपणाची माहिती नियमितपणे नोंदवावी. मल तपासणीचे (Fecal Egg Count) अहवाल जतन करून त्यानुसार पुढील जंत निर्मूलनाचे नियोजन करावे. या नोंदींच्या आधारे परजीवींचा प्रादुर्भाव, उपचारांचा परिणाम आणि उत्पादनातील बदल यांचे मूल्यांकन करता येते. त्यामुळे योग्य वेळी निर्णय घेणे, औषधांचा योग्य वापर करणे आणि परजीवी नियंत्रण कार्यक्रम अधिक प्रभावी व यशस्वी बनविणे शक्य होते.

- निखिल सोनोने
९९२१५१५१७९
(आचार्य पदवी विद्यार्थी, पशुसंवर्धन व दुग्ध शास्त्र विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी)

Scanned with OKEN Scanner